संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.

27 JAN 2026

प्राप्त झाले सही........................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, उप संचालक संवर्गातील श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील यांच्या महसूल विभाग बदलीबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

शासन आदेश :-संलेको-२०२५/प्र.क्र.१४०/कोषा प्रशा-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- २७.०१.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील, उप संचालक संवर्गातील श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूल विभागातील स्तंभ क्र.४ येथील पदावर महसूल संवर्ग बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| अधिकाऱ्याचे नाव व सध्याचे पद व कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूल विभाग | बदलून दिलेला महसूल विभाग | बदलीने पदस्थापना द्यावयाचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | पुणे | उपसंचालक (लेखा), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशिल HRMS मधील नमुन्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ता. र. पवार)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल -१/२(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *

२. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
५. संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
६. संबंधित अधिकाऱ्याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
७. प्रधान सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर,
८. श्री. शैलेंद्र गोविंदराव पाटील, उप संचालक*,
९. निवड नस्ती, कोषा प्रशा-२.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)